
# सौंदर्या

रेवण जाधव



साहित्य प्रतिष्ठान



# स्टेशन डायरी

रेवण जाधव

# स्टेशन डायरी

आणि

# सौंदर्या

लेखक

**रेवणनाथ जाधव**

नवल पब्लिकेशन, पुणे

For more such ebooks visit www.esahity.com

लेखक : रेवणनाथ जाधव,
गोखले नगर, पुणे ४११ ०१६
मो. ९३७०५२२५०१

© कॉपीराईट : रेवणनाथ जाधव

**प्रकाशक**
नवल पब्लिकेशन,
ऑफिस नं. १, त्रिमुर्ती (म्हाडा), कॉम्प्लेक्स
गोखले नगर, पुणे ४११ ०१६

**प्रथमावृत्ती :** ७ एप्रिल २०१०

**अक्षरजुळणी :** अनिकेत भालेराव

**मुखपृष्ठ :** अनुप देबडवार

**मुद्रक :** कल्याणी कॉर्पोरेशन, पुणे

**मुल्य :** ३० रुपये

© कॉपीराईट : रेवणनाथ जाधव
या पुस्तकातील कोणताही भाग, व्यक्तिरेखा, कथासुत्र यांचा कोणत्याही प्रकारे व्यावसायिक वापरावर (नाटक, सिनेमा) प्रतिबंध करण्यात आला असुन विनापरवानगी असे करणाऱ्यास दंड अथवा/आणि करावास कॉपीराईट ॲक्ट १९५७ कलम १२ नुसार होऊ शकते.
तसेच या दोन्ही संहितांची महाराष्ट्र रंगभूमी परिनिरिक्षण महामंडळ यांच्याकडे नोंदणी करण्यात आलेली आहे.
© नोंदणी क्र. स्टेशन डायरी : DMR १२१६/२००८
सौंदर्या : DMR १२१७/२००८

For more such ebooks visit www.esahity.com

# स्टेशन डायरी

समाजात शांतता व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी असलेल्या पोलिस यंत्रणेबाबत माझ्या मनात फार पूर्वीपासूनच आदरयुक्त भीती आहे. पुण्यात जी काही पोलिस स्टेशन्स आहेत त्यात रोज कित्येक प्रकारच्या गुन्ह्यांची नोंद करण्यासाठी जी नोंदवही असते तिला 'स्टेशन डायरी' म्हणतात. एका स्टेशन डायरीमधील तीन वेगवेगळ्या गुन्ह्यांची कथा इथे आपल्यापुढे सादर करत आहे.

## गैरसमज

आज दि. १६ मार्च २००८ म्हणजे अर्चना खिलारेचा वाढदिवस. गेल्याच महिन्यात तिचा साखरपुडा रेवण जाधवबरोबर झाला. आजचा स्पेशल दिवस या भावी जोडप्याने एकत्र साजरा करायचा ठरवला आणि दोघेही चतु:श्रृंगीच्या पार्कींगमध्ये सकाळी ११.४५ वाजताच भेटायला आले. अर्चनाने आरतीचे ताट घेऊन रेवणसोबत मूळ मंदिर गाठले. परत खाली येताना त्यांना काही भिकाऱ्यांच्या मुलांनी गाठलं.

रेवण-अर्चना या जोडीची गोष्टपण फार मजेशीर आहे. खरंतर रेवण एका अॅड एजन्सीमध्ये काम करतो. वेगवेगळ्या कंपन्यांसाठी नवनवीन सुंदर चेहरे शोधून देणे हेच त्याच काम.

त्याची एक मैत्रीण मॉर्डन कॉलेजमध्ये शिकते. तिला ऑगस्ट महिन्यात फ्रेंडीशिप डेसाठी फोन करून विश केले. तेंव्हा त्या मैत्रिणीने रेवणला कॉलेजवर



For more such ebooks visit www.esahity.com

बोलावलं म्हणून तो तिला भेटायला गेला.

**रेवण** : हाय वंदना !

**वंदना** : या महाराज, बऱ्याच दिवसांनी आठवण केलीत. काही विशेष कारण असणार. नाहीतरी तू फारच मतलबी आहेस पहिल्यापासून.

**रेवण** : बास, बास, पुरे झाले आरोप. अगं माझं काहीतरी ऐकून घे. मान्य आहे, मी कामाशिवाय कुणालाच फोन करत नाही. पण मला अशाच ठिकाणी जाऊन नवे चेहरे सापडतात. म्हणून मी आज खास तुझ्या कॉलेजमध्ये आलो आहे.

बोलता-बोलता ते कॉलेज कँटीनमध्ये पोहोचले. तिथे येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येक मुलीवर रेवणची नजर पडत होती. एका क्षणी त्याने अर्चनाला पाहिले आणि पुण्यातल्या एका पाऊडर कंपनीसाठी तिला लाँच करण्याचे रेवणने ठरविले.

रेवणने त्या दिवशी पावडर कंपनीच्या मॅनेजरबरोबर फोनवर बोलून त्या मुलीबद्दल सर्व माहिती सांगितली. कंपनीने त्या मुलीला भेटायला बोलावले. त्याच दिवशी रेवणने अर्चनाला कॉलेजमध्ये गाठून ही ऑफर सांगितली. गडबडलेल्या अर्चनाने घरी विचारून सांगते असे उत्तर दिले. त्यानंतर रेवण अर्चनाच्या घरी गेला. तिच्या घरच्यांना त्या जाहिरातीसाठी त्याने तयार केले.

## (पहिला ब्रेक)

एखाद्याकडून गोड बोलून काम करून घेण्याची कला रेवणला फार चांगल्या प्रकारे अवगत झालेली आहे. तिच्याच जोरावर त्याने अर्चनाच्या घरच्यांना तिने मॉडेलींग करावे हे पटवून दिले.

त्याने ठरविलेल्या Pinky Talcom Powder कंपनीच्या ऑफिसमध्ये ठरलेल्यावेळी रेवण अर्चनाला घेऊन पोहचला. कंपनीचे मालक श्री. गांधी यांच्यांशी अर्चनाची ओळख करून दिल्यानंतर गांधींनी अर्चनाला केबिनबाहेर बसायला सांगून रेवणशी बोलायला सुरुवात केली.

**गांधी** : जाधव, तुला मी मॉडेल बघायला सांगितले होते. ही तर न्यू कमर आहे.

**रेवण** : सर. मी तुमच्या नवीन प्रॉडक्टसाठी नवा फ्रेश चेहरा देतो आहे.

**गांधी** : पण तिला या क्षेत्राचा अनुभव नाही.

**रेवण** : सर प्रत्येक मॉडेल कधीतरी फ्रेशर असतोच ना, मग ?



For more such ebooks visit www.esahity.com

**गांधी :** हे बघ, मी तुला खरं काय ते सांगतो. माझं प्रॉडक्ट नवीन असलं तरी गांधी सुगंधीवाले हा एक ब्रँड आहे. मार्केटमध्ये माझी एक इमेज आहे. मला नवीन मॉडेलसोबत रिस्क नाही घ्यायची आणि तिची उंचीपण रेग्युलर नाही.

**रेवण :** ........

**गांधी :** I am sorry, but no option.

यामुळे चिडलेला रेवण अर्चनाला घेऊन तिच्या घरी गेला. त्याने आता ठरवले की अर्चनाला लवकरच कुठेतरी लाँच करायचे.

त्यानंतर पुढच्याच आठवड्यात पुण्यात नव्याने सुरू होणाऱ्या 'पैठणी आणि नऊवारी' साडी स्पेशल कंपनीने मराठी चेहऱ्याची मॉडेल हवी अशी मागणी रेवणच्या एजन्सीला केली. यावेळी निवड झालेल्या नव्या पाच मॉडेल्समध्ये अर्चनाचा नंबर लागला. पुण्यात ठिकठिकाणी होर्डिंग्जवरून अर्चना झळकली. शोरुमच्या उद्घाटनालाही तिला बोलावून एक पैठणी दिली गेली.

या सगळ्या प्रसिद्धीनंतर मात्र अर्चनाला खूप मागणी वाढली. स्वत: श्री. गांधी यांनी रेवणला फोन करून अर्चनाच्या डेट्स घेतल्या. आता तर अर्चनाचे नऊ मोठे मोठे होर्डिंग पुण्याच्या नऊ मुख्य चौकात झळकताहेत. त्यातलाच एक पुणे विद्यापीठ चौकातही आहे.

## (लग्नाची गाठ)

मॉडेलींगसाठी अर्चनाला करावी लागणारी सगळी धावपळ, खरेदी, नव्या ओळखी-पाळखी यासाठी सतत फिरतीवर असणारा रेवण तिला स्वत: प्रत्येक ठिकाणी नेणार व घरी आणून सोडणार, तसेच तिचे सर्व आर्थिक व्यवहार तोच सांभाळणार या बोलीवर अर्चनाच्या पप्पांनी तिच्या मॉडेलिंगला परवानगी दिली होती.

त्यांच्या या सतत एकत्र रहाण्या-बोलण्यामुळे तिच्याबाबत लोकांत कुजबुज सुरू झाली. नातेवाईक ही अर्चनाला एका मुलासोबत पाहिल्याचे सांगू लागले. आता या सर्वांना काय उत्तर द्यायचे, असा प्रश्न अर्चनाच्या घरच्यांना पडला.

एके दिवशी तिच्या वडिलांनी रेवणला घरी भेटायला बोलावून सर्व परिस्थितीची माहिती दिली.



For more such ebooks visit www.esahity.com

पप्पा : रेवण आम्ही तुला आता बरेच दिवस ओळखतो आहे म्हणून मी तुला हे सगळं सांगितलं.

रेवण : काका तुम्ही नक्की काय विचार करताय. मला माहिती नाही. पण तुम्हीच या सगळ्यावर काहीतरी उपाय सुचवा.

पप्पा : तू एक चांगला मुलगा आहे. अर्चनाला तुझ्यामुळेच नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. ती चार पैसे कमवायला लागली. तुम्ही फार मिसळून गेलाय.... मला वाटतं की तुम्ही लग्न करावं.

रेवण : माझी काहीच हरकत नाही. फक्त माझ्या घरी एकदा बोलून घेतो.

पप्पा : तशी घाई नाही. वाटलं तर मी बोलतो तुझ्या घरच्यांशी.

यानंतर एकच महिन्यात त्यांचा साखरपुडा झाला आणि एप्रिल महिन्याची तारीख नक्की ठरली. लग्नानंतरही अर्चनाने शिक्षण व काम चालू ठेवण्यास रेवणची हरकत नाही.

आज अर्चनाच्या वाढदिवसाला दोघांनी कामाला सुट्टी घेऊन एकमेकांसोबत दिवस घालवायचा ठरवलं दिवसाची सुरुवात चतु:श्रृंगीपासून केली.

अर्चनासारख्या अनकॉमन व फेमस चेहरा पहाणे, तिला भेटणे सगळ्यांना आवडणार आहे. म्हणूनच त्या भिकारी पोरांनी अर्चनाला गराडा घालून पैसे मागायला सुरुवात केली.

नेमकं याचवेळी रेवणला एक फोन आल्यानं तो हळूहळू पायऱ्या उतरत होता. तर या भिकारी पोरांनी अर्चनाला गराडा घालून तिच्याकडची सगळी चिल्लर काढून घेतली.

रेवण : झाला दान धर्म ? आता चला लवकर पळून जाऊन लग्न करायचं ना.

अर्चना : अहो या पोरांनी बघा ना वैताग आणलाय नुस्ता. मला बरोबर घेऊन. 'ताई' पैसे दे ना, तुला मुलगा होईल पाहिजे त्याच्याशी लग्न होईल, म्हणून बरोबर पैसे काढून घेतले.

रेवण : तीच तर त्यांची पॉलिसी असते. एखादं जोडपं गाठून गोड बोलून पैसे उकळायचे आणि हो सगळे दागिने आणि पैसे तुझ्याकडे आहेत हे पण त्यांना माहिती असणार.

अर्चना : चला उशीर होतोय. आता तर युनिर्वसिटीची बँक बंद झाली तर पैसे भरणे राहून जाईल. उगाच उशीर नको. कसं जायचं ?



For more such ebooks visit www.esahity.com

**रेवण :** ऑफ कोर्स चालत. नाहीतरी तुझ्याशी मला बरंच बोलायचं. तुला पकवतो ना जरा.

ते दोघे विद्यापीठाच्या एका रस्त्यावरून बँकेकडे जाताना एक मोटारसायकल घेऊन तेथे दोघे तरूण त्यांना लुबाडण्याच्या इराद्याने आडवे आले. त्यातल्या एकाला रेवणने नुकतेच चतु:श्रृंगीपाशी पाहिल्याचे आठवले. तोच बाईक चालवत होता. तर त्याचा साथीदार हातातला चाकू दाखवून या जोडप्याला धमकावून पैसे, दागिने, मोबाईल मागू लागला तर अवघ्या १५ ते २० फुटांवर पहिला लुटारु बाईक सुरू ठेवून पळण्याच्या तयारीत होता.

मार्चच्या उन्हाळ्याच्या भर दुपारी १२.३० च्या सुमारास हा प्रकार घडताना रस्त्यात गर्दी तर नव्हती आणि त्या लुटारुकडचा चाकू पाहून अर्चना घाबरली. तिने गडबडीत पर्स उघडून पैसे देण्याची तयारी दाखविली तर रेवणने खिशातला महागडा मोबाईल त्याच्यापुढे धरला. तो चोर मोबाईल घेण्यासाठी पुढे सरसावला तसा रेवणने मोबाईल हातातून सोडून दिला. तो रस्त्यावर पडला. चोर मोबाईल उचलण्यासाठी खाली वाकला तसा रेवणने त्याला जोराचा धक्का देऊन रस्त्यावर पाडला. या अनपेक्षित हल्ल्याने दोघे चोर गडबडले. गाडीवरचा भरर्कन पुढे निघून गेला. तर दुसरा जवळच्या झाडीत पसार झाला. रेवण त्याच्या मागे धावला आणि अर्चनाने 'चोर चोर' असा ओरडा सुरू केला.

झाडीतल्या चोरावर रेवणने दोनच मिनिटात ताबा मिळविला आणि त्याच्या शर्टाला धरून चतु:श्रृंगी पोलिस स्टेशन गाठलं. दुपारच्या निवांत वेळी काही पोलिस जेवत तर काही गप्पा मारत होते. मात्र रेवणला पाहून काहीतरी वेगळा प्रकार घडल्याचं त्यांच्या लक्षात आलं. तसं त्यातल्या एकाने रेवण-अर्चनाला बसायला सांगून चोराच्या दंडाला पकडून एका कोपऱ्यात बसवलं. रितसर तक्रार लिहून घेतल्यावर रेवणने पोलिसांची रजा घेतली. तोपर्यंत एक पीएमटी स्टेशनच्या दारात येऊन उभी ठाकली. त्यातूनही कंडक्टर व ड्रायव्हर एकेकाला पकडून पुढे व एक विवाहीत तरूणी मागे आणि सोबत इतर प्रवासी असा लवाजमा स्टेशनमध्ये शिरला.

कंडक्टर : साहेब तक्रार द्यायची या दोघांची. साले बसमध्ये हाणामारी करत होते.

पैकी एक तरूण होता मंदार-दुसरा गणेश धोत्रे तर ती तरुणी मंदारची मामी होती. त्याची कथा पुढीलप्रमाणे -



For more such ebooks visit www.esahity.com

# (नस्ती उठाठेव)

विद्यापीठात कंत्राटी पद्धतीने कॉम्प्युटर ऑपटेरची परीक्षेच्या काळात भरती चालू असते. अशाच एका कामासाठी मंदार व त्याची मामी सायलीला घेऊन तिथे आला होता. यानंतर विद्यापीठाच्या शेवटच्या बसस्टॉपवरून स्वारगेटची बस पकडून ती पुढे भारती विद्यापीठात काही कामानिमित्त जाणार होती म्हणून मंदार तिला बसमध्ये बसवून बाणेरला पुन्हा त्याच्या घरी निघाला होता.

मंदार बाणेरमध्ये रहायला आहे. तो औंधमधल्या एका कॉल सेंटरमध्ये काम करतो. त्याचं बारावीपर्यंतच शिक्षण इंग्लिश मीडियममध्ये झाले. म्हणूनच त्याला पटकन हा 'जॉब' मिळाला. पुढे कॉलेज न करता मास कम्युनिकेशनमध्ये डिप्लोमा कर असं त्याच्या वडिलांनी त्याला सांगितलं. त्याचे वडील एका प्रायव्हेट इंग्लिश स्कूलमध्ये क्लार्क म्हणून काम करतात. त्यामुळे पुणे विद्यापीठातही त्यांची बऱ्यापैकी ओळख आहे.

मंदारचा मावस मामा श्रीकांत याच्याशी सायलीचं लग्न एक वर्षापूर्वी झालं. दोघेही पदवीधर असून कॉम्प्युटर, इतर विषय याबाबतीत दोघेही नवरा-बायकोचे ज्ञान सारखेच आहे. श्रीकांत त्यांचा मित्र महेशसोबत काम करतो. महेश हा एक सिव्हील इंजीनियर आहे. तो स्वीमिंग पूल बनवण्याचे कॉन्ट्रॅक्ट घेतो तर श्रीकांत त्याच्यासाठी मार्केटिंग आणि अकाउंटस्‌चे काम बघतो. कधी कधी त्याला पुण्याबाहेर जायला लागते. कामानिमित्त जास्त वेळ घराबाहेर असणाऱ्या श्रीकांतला सायलीसाठी रविवारखेरीज वेळच नसतो.

हडपसर भागात राहणाऱ्या सायलीचे लग्न खडकीतल्या श्रीकांतबरोबर एक वर्षापूर्वी एका वधू-वर सूचक मंडळातर्फे जुळलं. ते यथासांग पार पडलं. लगेचच आठवड्याभरासाठी ते जोडपं माथेरानला रवाना झाले.

हनिमुनच्या पहिल्याच रात्री श्रीकांतने सायलीला काही गोष्टी सांगून टाकल्या.

**श्रीकांत** : आज बऱ्याच दिवसांनी इतका निवांतपणा मिळालाय. तुला माहिती आहे मला नव्या साईटस मिळवण्यासाठी इतका त्रास सहन करायला लागतो की बस्स. खाण्या पिण्याचं टाईमिंग नाही. चालू साईट आणि नवीन कामाची ठिकाणं शोधताना जाम वैताग येतो.

**सायली** : पण तुम्ही दोघंही मिळून ते काम करताना.



For more such ebooks visit www.esahity.com

श्रीकांत : हो तरीही, त्याचं साईटवर थांबणं गरजेचं असतं. एक वेळ मी तिथे नसलो तरी चालतं; पण खड्डा किती, कसा घ्यायचा. फरशा कसल्या वापरायच्या या सगळ्याची पूर्ण माहिती मला नाही.

सायली : त्यापेक्षा कुठेतरी ऑफिसमध्ये काम केलं तर.

श्रीकांत : ऑफिसमध्ये जाम कटकटी असतात. पगार ठरलेला आणि कमी असतो.

सायली : मग या कामात किती पैसे मिळतात.

श्रीकांत : इथं मला एका साईटचे १५ ते २० हजारापर्यंत मिळतात. आपल्याला नवीन घर घ्यायचं म्हणून मी जास्त वेळ काम करतो. कधी कधी तर पुण्याबाहेर मुक्कामी पण जायला लागतं.

सायली : मग तो खर्च तुमचाच असतो.

श्रीकांत : हो, बरं कामाचं जाऊ दे मी तुला महत्त्वाचं जे सांगतोय ते लक्षात ठेव. आपल्याला बाळाची घाई नको करायला. थोडे महिने तरी आपण प्लॅनिंग करू. एकदा का नवीन फ्लॅटचा ताबा मिळाला की मग ठरवू काय ते.

तो आठवडा तर पटकन संपला. मात्र त्यानंतर श्रीकांतचा कमी मिळणारा सहवास. सासुचा कुणाशीही जुळवून न घेणारा स्वभाव यामुळे सायली फारच एकटी पडली. ती हळूहळू अबोल बनत गेली. श्रीकांत जर दोन-तीन दिवस परगावी गेला तर ती पण ते दिवस माहेरी घालवायची. त्यामुळे तिची सासु तिच्याशी अबोला धरायची. दिवसभर टी.व्ही समोर बसून रहायची कुणाच्यातरी दुसऱ्यांच्या घरातील भांडण ऐकून म्हणायची ''बाई असं जर आम्ही आमच्या सुनेशी वागलो तर ती घर सोडून पळूनच जाईन'' शेजाऱ्यांना घरात बोलावून त्यांच्याशी गप्पा मारायच्या. पण घरात एकमेकींचं बोलणं नाही.

या सगळ्या गोष्टींचे परिणाम सायलीच्या मनावर फार वेगळे झाले. तिची होणारी धुसमट कुणालाही कळत नव्हती. मग ती नवऱ्यासोबत भांडायची. तो पण चिडायचा, आदळ आपट करायचा. त्यामुळे बिझनेसवर होणारा परिणाम पाहून महेशने एका चॅरिटेबल ट्रस्टमध्ये काऊन्सेलिंगला नेण्याचा सल्ला श्रीकांतला दिला.

डॉक्टर : श्रीकांत प्रॉब्लेम फक्त तुझी आई किंवा पत्नी नाही. तर हा जनरेशन



For more such ebooks visit www.esahity.com

गॅप आहे. इगो तर प्रत्येकालाच असतो. भांडतांना माघार घेणे सगळ्यांना जमत नाही. पण तुझ्या आईचा अडाणीपणा पण याला कारणीभूत आहे.

सायली तुला श्रीकांतला सोडून जगता येईल का ?

**सायली** : नाही. त्यांनी फक्त मला थोडा वेळ दिला ना तर मला माझं मन त्याच्याकडे मोकळं करता येईल. पण ते ऐकूनच घेत नाहीत. मला म्हणतात तू फोनवर कटकट नको घालत जाऊस.

**श्रीकांत** : मॅडम. माझा जॉब असा आहे की मी जर हिच्याशी भांडत बसलो तर माझी कामं पेंडींग राहतात. मग माझीपण विनाकारण चिडचिड होते.

**डॉक्टर** : या सगळ्याचं मुळ आहे ते सायलीचं सततचं एकटेपण. तू तिला कशात तरी गुंतव. वाचन, खेळ, क्लब जॉइट करून किंवा छोटीशी नोकरी करून. जेणे करून ती घराबाहेर राहील आणि चार लोकांत मिसळली तर तिचं विचारचक्र थांबून तिला नव्या गोष्टी शिकायला मिळतील.

तुम्हा दोघांना वेगळं तर नक्की नाही व्हायचं. मग तिला घराबाहेर पडून जॉब करू दे. पैसे कितीही मिळाले तरी चालतील.

ही गोष्ट श्रीकांतला पटली आणि लवकरच त्याने सायलीला ओळखीतल्या एका ऑफिसमध्ये काम शोधून दिलं. पण सायली अजून सावरलेली नव्हती. तिच्या कामात काहीतरी चुकत होतं. तिचा कॉम्प्युटर कोर्स होऊन तीन ते चार वर्षे होऊन गेल्याने ऑफिसमध्ये तिला बऱ्याचदा कॉम्प्युटरवर काम करताना दुसऱ्याची मदत घ्यावी लागत होती.

आणि एके दिवशी तिच्या ऑफिसमधून श्रीकांतला फोन आला. त्यांच्या म्हणण्यानुसार सायलीला नीट काम करता येत नाही. तसेच ऑफिसची जबाबदारीची कामे तिला झेपणार नाहीत. त्यापेक्षा तिने कुठेतरी कमी जबाबदारीचे काम शोधावे.

यानंतर श्रीकांतने सायलीला कुठेतरी फक्त डाटा एन्ट्री ऑपरेटर म्हणून जॉब मिळेल का याची मंदारकडे विचारणा केली. त्यानुसार मंदार सायलीला पुणे विद्यापीठात घेऊन आला होता. त्यांचं काम आटोपून सायली बसमध्ये येऊन बसली.

तोवर बसमधली दोन-चार माणसं कंटाळली होती. अशातच अचानक बसमध्ये गणेश धोत्रे त्याचा मित्र सचिन वैराट सोबत येऊन स्थानापन्न झाला.



For more such ebooks visit www.esahity.com

**गणेश** : साल्या घरचे लग्न ठरवतात तर करना तुझ्या बापाचं काय जातंय? आता काम बिमपण चांगलं लागलंय ना ?

**सुनील** : अरे येड्या, पण पोरगी तरी चांगली नको का ? का उगाच कुणाशी पण लग्न करायचं ?

**गणेश** : हा नाहीतरी तुमची सोय होतीच की जवळच. संगीता. काय रे मजा येती का नाही ? तुमचं बरं आहे. बाबा लयचं चिकणी पोरगी तुमच्या घराजवळ सर्व्हिस देती.

**सुनील** : आता तिचंच घे ना. चांगलं लग्न ठरलं. साखरपुडा झाला. पण नंतर हुंड्यावरून तिचं लग्न मोडलं. पण तोवर त्या पोरानं तिला दोन तीनदा अडकवली आणि मग ती बिथरली. आता जाती कुणाबरोबर पण.

इतक्यात गणेशचा मोबाईल वाजला.

**गणेश** : बोल रे पक्या मिळाली ना तिकिटं ?...

पण मी तुला सकाळी लवकर लाईनीत थांबायला सांगितलं होतं ना?

मग आता?

बरं पण तिथं तर मिळणार का ?

हा ठीक आहे. ठेव नंतर फोन कर.

**सुनील** : काय रे तिकिट नाही. मग आता काय गोट्या खेळायच्या?

**गणेश** : नाही सिटीप्राईडला जातोय तो. या आयघाल्याला ना कधीतरी लवकर उठायला सांगितलं तर हा जाऊन बसलाय तासभर हगायला.

**सुनील** : बघू मोबाईल गाणं तरी ऐकतो.

'तुझी घागर नळाला लाव' गाणं ऐकत दोघांच्या गप्पा चालू होत्या. तितक्यात सायलीला मंदार गाडीवर परत येताना दिसला. तो पण बसमध्ये चढला.

**सायली** : आता काय झालं, परत का आलास ?

**मंदार** : तू पण असली हुशार आहेस ना मामी तुझा मोबाईल माझ्याच खिशात राहिला तुला नाही कळलं.

**सायली** : नाही, बरं झालं तू परत आलास....

त्या दोघांना गप्पा मारताना पाहून गणेश सुनीलशी हसला आणि...

**गणेश** : आयला ह्यांचं बरं आहे. मामीशीच लफडं...



For more such ebooks visit www.esahity.com

मंदारने ते ऐकलं आणि गणेशवर जवळ जवळ झडपच घातली. मग त्याने गणेशला सटासट थोंबाडीत मारत शिव्या द्यायला सुरुवात केली. सोबत मध्येमध्ये विनवण्या करणाऱ्या सुनीलला आधी दम आणि मग दोन फटके दिले.

या प्रकारामुळे बसमध्ये गोंधळ उडाला. इतर प्रवाशांच्या आवाजामुळे कंडक्टर आणि ड्रायव्हर धावत गाडीत आले. तरीही मंदार ऐकेना म्हटल्यावर ड्रायव्हरने गाडी सरळ पोलिस स्टेशनला घेतली. या अशा विचित्र घटनेची नोंदही विद्यापीठ परिसरात असलेल्या पोलिस स्टेशनच्या डायरीत आहे.

## (बदला)

त्याच दिवशी दैनिक सकाळमध्ये दि. १४ मार्चला बाणेर रस्त्यावर घडलेल्या अपघाताची बातमी छापून आली होती. या बातमीमुळेच अजून एक गुन्हा उघडकीस आला. ती विशेष बातमी पुढीलप्रमाणे.

दुपारी दीडच्या सुमारास बाणेर रस्त्याने जाणाऱ्या एका दुचाकी वाहन चालकाला मागून जोरात धडक बसल्याने रस्त्याचा मार लागून डोके फुटून रवी कांबळे (वय २४, रा. हिल स्टेशन रोड, बाणेर रस्ता, पुणे) या दुचाकीस्वार तरुणाचा जागीच मृत्यू झाला. तर बेफाम वेगात धडकलेली चारचाकी उलटून समोरून येणाऱ्या दुसऱ्या चारचाकी वाहनाला धडकल्याने चालक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर पिंपरी चिंचवड येथील यशवंतराव चव्हाण हॉस्पिटलमध्ये उपचार चालू आहेत.

पुणे विद्यापीठ पोलिस स्टेशन प्रमुख सदर अपघाताची सखोल तपासणी करत आहेत. चारचाकी चालक अवधेश मिश्रा (वय २२, मुळ रा. छपरा उत्तर प्रदेश) सध्या डी.पी. रोड औंध येथे राहत असून तो शुद्धीवर आला की तपासाला वेग मिळेल, असे पोलिस सूत्रांनी सांगितले.

वरील बातमी वाचून २५ वर्षीय महेश गायकवाड व त्याचा मित्र प्रसाद मेमाणे पोलिस स्टेशनवर आले. त्याने त्या बातमीचा संदर्भ देत पोलिस इन्स्पेक्टर पवार यांना त्या अपघाताबद्दल स्वत:च्या मनात शंका असल्याचे सांगितले. तो आणि प्रसाद खुर्चीत बसताच.

**श्री. पवार :** बोल बाबा, ही तर साधी सरळ अपघाताची केस असताना तुला हा खुनाचा प्रकार का वाटतोय ?



For more such ebooks visit www.esahity.com

महेश : सर मी रवीला फार जवळून ओळखतो. त्याला मारायचा प्रयत्न होणार अशी शंका मला कॉलेजमध्ये असतानाच होती. त्याचं कारणही तसंच आहे.

प्रसाद : सर प्रमोद सुतार नावाच्या आमच्या एका मित्राचा हा कट असावा असं मला वाटतं.

पवार : का ? त्याला काही विशेष कारण आहे का ?

महेश : साहेब, मी, रवी, प्रमोद आणि हा प्रसाद एकत्र शिकायला होतो. त्यावर्षी प्रमोदने त्याच्या वाढदिवसाला आमच्या वर्गातल्या शितलला स्वत:साठी प्रपोज करायला सांगितले होते. रवीने तसं केलं. पण घडलं सगळं उलटंच शितलने प्रमोदऐवजी रवीच्या प्रपोजला आणि डेअरिंगला दाद देत उलट त्यालाच प्रपोज केले आणि या सगळ्याची सुरुवात झाली.

त्या दोघांचं प्रेम प्रकरण कॉलेज संपलं तरी चालूच होतं. ते दोघं या 'मे'मध्ये लग्न करणार होते. म्हणून मला वाटतं की प्रमोदने रवीचा काटा काढला.

१० ऑक्टोबर २००७ रोजी प्रमोद सुतार त्याच्या मित्रांसोबत फर्ग्युसन कॉलेजमध्ये स्वत:चा वाढदिवस साजरा करत असताना त्याच्याच वर्गात शिकणारी शितल साठे त्याला समोरून येताना दिसली. ती तिच्या मैत्रिणींसोबत लायब्ररीत गेली. त्यानंतर ती निदान दोन तास तरी बाहेर येणार नव्हती. केक कापल्यानंतर मित्रांनी मिळून प्रमोदला शर्ट गिफ्ट दिला. तसा तो शर्ट हेच फार मोठे गिफ्ट होते. तरीही प्रमोदने रवीला बाजूला घेतले.

प्रमोद : आजच्या दिवशी मी शितलला प्रपोज केलं तर ती नाही म्हणेल का ?

रवी : तुला भीती वाटत असेल तर मी विचारतो तुझ्यासाठी म्हणजे ती नाही म्हटली तरी तुझी इज्जतपण नाही जाणार.

प्रमोद : बरं मग लगेच विचारतोस, का कॉलेज सुटल्यावर ?

रवी : हे काय आता लगेच. आपल्याला काही वेळ नाही लागत.

आणि रवी लायब्ररीकडे निघाला. त्याने आत जाऊन शितलला जाऊन हळूच सांगितलं.

रवी : शितल मला तुझ्याशी थोडं बोलायचंय बाहेर जिन्यात येतेस का?



For more such ebooks visit www.esahity.com

शितलही त्याच्या पाठोपाठ पोर्चमध्ये आली.

**शितल** : मी तुला ओळखत नाही. पण वर्गात बऱ्याचदा पाहिले आहे तुला आणि माझ्याशी बोलण्याची डेअरिंग केलीस त्यामुळे मी इंप्रेस झाले. बोल काय विचारायचंय.

**रवी** : माझ्या मित्राचा प्रमोद सुतारचा आज वाढदिवस आहे आणि मी त्याला प्रोमिस केलं आहे की आज तुझी फ्रेंडशिप त्याला गिफ्ट म्हणून मिळवून देईल. मला तुझं उत्तर लगेच पाहिजे.

**शितल** : I am impressed तुझ्या मित्राला निरोप दे की मी त्याच्या प्रपोजलला नकार दिला...

पण तु माझा फ्रेंड होशील का ?

**रवी** : चालेल. माझी काहीच हरकत नाही. मी तुला कॉलेज सुटल्यावर पार्कींगमध्ये भेटतो.

रवी फार आनंदून गेला. त्याने घडला सर्व प्रकार प्रमोदला सांगितला. प्रमोदने हसून परिस्थितीचा स्वीकार केला. त्यानंतर शितल व रवी कॉलेजमध्ये व बाहेरही बऱ्याचदा एकत्र दिसायचे. हळूहळू रवीला कळायला लागले की शितल सर्वसामान्य मुलगी नाही. ती फार वेगळी आहे. तिची हुशारी, हजरजबाबीपणा, निर्णय क्षमता, प्रसंगावधान या गोष्टींचा अनुभव हळूहळू रवीला येत गेला. एक परिपक्व व्यक्तिमत्त्व आणि आनंदी स्वभाव यामुळे रवी तिच्यात फार पटकन मिसळून गेला.

मुळातच पालक सुशिक्षित असतील तर त्यांची मुलेही कशी हुशार असतात याचं उत्तम उदाहरण होती 'शितल'. दहावीपर्यंत इंग्रजीमध्ये शिक्षण पूर्ण केल्यानंतर तिने बारावी सायन्स साईडने पास केली. नंतर मात्र इंग्लिश विषय स्पेशल ठेवून तिने बी.ए. करायचे ठरविले आहे. ग्रॅज्युएशननंतर आयपीएस किंवा आयएएस परीक्षा पास करून चांगल्या हुद्याची नोकरी मिळवायची तिची इच्छा आहे.

तिचे वडील एका खासगी कंपनीत मॅनेजर आहेत तर आई सेंट्रल गोव्हर्न्मेंटमध्ये नोकरी करते. घरी आर्थिक सुबत्ता असुनही साधी रहाणी तिला आवडते. फक्त गरजेच्याच वस्तू खरेदी करण्याकडे तिचा कल असतो.

अशा हुशार मुलीची सोबत मिळाल्यापासून रवीमध्येही काही पॉझिटिव्ह बदल घडून आले. रवीने एकदा शितलला लग्नासाठी मागणी घातली. मात्र शितलने शिक्षण पूर्ण झाल्यानंतर लग्न करू असं त्याला सांगितलं.



For more such ebooks visit www.esahity.com

ही गोष्ट कॉलेजमध्ये पसरायला वेळ लागली नाही. प्रमोदला या गोष्टी त्याच्या ग्रुपमधल्या इतर मुलांकडून समजत होत्या. त्यामुळे तो रवीवर खूप चिडला होता. पण जवळचा मित्र असल्यामुळे तो रवीला काहीही करू शकत नव्हता. मात्र त्याला टोमणा मारणारे किंवा त्याच्याविषयी दया दाखविणारे कमी नव्हते. अशावेळी योग्यवेळी योग्य व्यक्तिकडून रवीला अद्दल घडविता येईल या विचाराने प्रमोद स्वत:ची समजूत घालत असे.

शितलच्या दीर्घ सहवासात असणारा रवी मात्र पुढे येणाऱ्या संकटापासून पूर्णपणेअनभिज्ञ होता आणि त्याच्या उज्वल भवितव्याची गुलाबी स्वप्न रंगवत होता.

आता तर पोलिसही या केसचा नव्या पद्धतीने तपास करू लागलेत. अवधेश मिश्राच्या फेर तपासणीत प्रमोद सुतारचा उल्लेख झाला आणि अवधेशने एकाच दिवसात गुन्हा कबुल केला.

प्रमोदचा मित्र शंकर गुंजाळ व अवधेश एकाच गॅरेजमध्ये कामाला आहेत तर एका दिवशी प्रमोदने शंकराला सांगून पाच हजारात रवीला रस्ता अपघातात मारण्याची सुपारी दिली होती, असे कबुल केले. पोलिसांनी मग प्रमोद सुतार आणि शंकर गुंजाळ यांना अटक केली आणि त्यांनीही सदर गुन्हा कबूर केला.

आता वर नमूद केलेल्या सर्व गुन्ह्याबाबत पुढे काय कसं घडलं याबाबत सविस्तर लिहिणे म्हणजे मला थोडे चुकीचे वाटते. म्हणून मी इथे थाबतोय. मला फक्त एखादा गुन्हा कसा घडतो व कसा उघड होतो. याची माहिती तुम्हाला द्यायची होती.

महाराष्ट्र पोलिसांना अर्पण





For more such ebooks visit www.esahity.com

# -: सौंदर्या :-

सुंदर असण ही नैसर्गिक बाब आहे. प्रत्येकाचा चेहरा, शरीराची ठेवण, रंग, उंची, बांधा इत्यादी गोष्टीत भिन्नता असते. आपण सुंदर दिसाव यासाठी प्रत्येकजण नेहमी प्रयत्नशील असतो. तरीही सगळ्याच मुली ऐश्वर्या रॉय किंवा सगळी मुलं हृतीक रोशन नसतात. कारण प्रत्येकाला वेगवेगळा चेहरा जन्मत:च मिळाला आहे. या सगळ्या चेहऱ्यांच्या भाऊ गर्दीत आपल्याला सुंदर वाटणारा चेहरा आपण शोधतो. पण 'सौंदर्य हे दुधारी शस्त्राप्रमाणे असतं. ते बघणाराआणि धारणकर्ता दोघांनाही घातक ठरू शकत.' या, मी कुठतरी वाचलेल्या वाक्यावर माझी कथा आधारितआहे. या कथेबाबतही चांगले - वाईट अभिप्राय मिळणार हे माहीती असूनही मी लिहीतोय, कारण ती एक पूर्णपणे काल्पनिक कथा आहे.

पुण्याच्या पाषाण परिसरात डोंगर पायथ्याला दोन वर्षापुर्वी नव्यानेच बसलेल्या एकाच पाच इमारतीच्या सोसायटीत घडलेली ही कथा. ही सोसायटी ऊन, वारा, पाऊस या तिन्ही ऋतुंची नैसर्गिक देणगी पूर्णपणे उपभोगणारी अशी आहे. तिथेच दोन वेगवेगळ्या इमारतीत राहणाऱ्या नायक - नायिके बाबत मी लिहतोय.

प्रवीण जगताप हा २४ वर्षांचा तरुण एका फायनान्स कंपनीत कामाला आहे. इतरांपेक्षा काही वेगळा नसला तरी तो या कथेचा नायक आहे. आज १५ जून ०४ रोजी पाऊस रिमझिम पडत होता. तेव्हा प्रवीण दीड तास लवकरच ऑफीसमधून निघाला. त्याने घरी येऊन कपडे बदलल्यावर पाऊस थांबला. तेव्हा खास पावसाळी मृदगंध घेण्यासाठी तो त्याच्या इमारतीच्या गच्चीवर आला. या वर्षीची पहिल्या - पहिल्या सरीपैकी ही एक पावसाची सर होती. सगळीकडे आल्हाद्दायक गारवा पसरला आहे. भिजलेल्या मातीचा सुंगध उरात भरून घेत प्रवीणने सलीम या त्याच्या बालमित्रांच्या मोबाईल वर फोन लावला.

**सलीम** : काय साहेब ? आज कशी काय आठवण झाली ?



For more such ebooks visit www.esahity.com

प्रवीण : अरे यारं, या romantic वातावरणात कुठतरी फिरायला जाण्याचा मोह होतोय.

सलीम : पण मग एखाद्या मुलीला तरी विचारायस मला काय फोन करतोय?

प्रवीण : मला तुमच्या दोघांशिवाय जवळच कुणीच नाही. आणि काय रे एरव्ही आपण तिघंच बापे फिरत असतो ना सगळीकडे Gayअसल्यासारखेफ

सलीम : ओ महाराज माझा आता फिरायचा बिरायचा काही मुड नाही हा. उदया कॉलेजवर जाऊन रिझलटची चौकशी करायची मला. तुझ बर आहे B.Com. केलस, नोकरीपण लगेच लागली आम्ही अजून Degree च करतोय.

प्रवीण : अरे यार वातावरण काय Romantic झालय आणि तु मला पकवतोस चल ठेव फोन

सलीम : बाय See you on next Sunday

प्रवीण : Bye take care.

प्रवीण, सलीम, रविराज (राज) ही त्रयी लहानपणापासून एकत्र उठली - बसली, पैकी राज व प्रवीण त्यांच पूर्वीच घर सोडून नवीन घरी रहायला आलेले सल्लु (सलीम) मात्र कॉलेज जवळ असल्यानं तिथेच रहातो. दर रविवारी हे ति एकत्र येतात. एकमेकांच Life Share करतात. परततात आणि तरीही एकमेकांना फोन करतात, रोजच्या रोज.

ओल्या झालेल्या गच्चीवर बसता येत नसल्याने प्रवीण फेऱ्या मारू लागला. त्याच्या डाव्या बाजूला डोंगर तर उजवीकडे सोसायटीच्या इमारती उभ्या होत्या. प्रवीण चालता - चालता त्याच्या गच्चीच्या एका कडेच्या कठड्याजवळ थांबला. त्याच्यापासून तिसऱ्या मजल्यावरच्या एका खिडकीत एक मुलगी कपडे बदलताना त्याला दिसली.ती पाच सहा महीन्यापूर्वी त्या घरात रहायला आली होती. नुकतीच कॉलेजातून घरी येताना ती थोडीशी भिजली होती. तिचा नकळत प्रवीण तिला न्याहाळत होता. ओले कपडे काढून तिने गाऊन घातला आणि ते ओले कपडे ती तिथेच खिडकीत वाळत घालण्यासाठी मागे वळली. तसा प्रवीणही मागे सरकला तिने त्याला पाहील नाही असं त्याला वाटल.

रविवारी हडपसरच्या मगरपट्टा रस्त्यावर फिरताना त्याच्याकडच्या नवीन CDS



For more such ebooks visit www.esahity.com

च्या स्टॉक बद्दल सांगताना त्यांना मध्येच थांबवत प्रवीणने परवाचा प्रसंग त्याच्या दोन खास मित्रांना सांगितला. तेव्हा थोड्या नाराजीच्या सुरात त्यांनी प्रवीणला 'हे असं वागणं तुला शोभत नाही.' "It is bad manners ' असं सुनावल आणि बऱ्याच गप्पानंतर ते एकमेकांना अलिंगन देऊन स्वगृही निघाले. राजला विमाननगर पर्यंत कंपनी दिल्यानंतर प्रवीणची गाडी मॉडेल कॉलनीकडे निघाली. सलीमच्या घरी चहापान होईपर्यंत साडे आठ वाजले. तेव्हा प्रवीण गडबडीत घरी जायला निघाला. आता तर तो रोजचा संध्याकाळी नाश्ता झाला की गच्चीवर फिरत असे. एकटाच असल्याने तो पाहीजे तितकावेळ तिथेच घालवत असे. एके दिवशी त्याला 'त्या' मुलीच नाव सीमा असल्याच समजल नाव सोडल तर तिच्यातल्या गुणांना आणि सौंदर्याला सीमा नव्हती. आता तिला पहात राहण हा प्रविणचा छंद बनला.

बरेच दिवस उलटल्यानंतर साधारण दिवाळीत सीमाच्या घरी तिची मोठी बहीण रहायला आली. ती विवाहीत आहे हे तिच्या गळ्यातल मंगळसूत्र आणि राकट चेहऱ्याच्या तिच्या नवऱ्याला पाहील्यावर लक्षात येत होत. दोघी बहिणी कित्येकदा तासन तास गप्पा मारत बसलेल्या दिसायच्या. त्या फार कमी वेळा घरातून बाहेर पडायच्या. दिवाळी संपल्यानंतर दोन दिवसांनी हर्षदा पुन्हा सासरी गेली. तिला बस स्टॉपवर सोडायला गेलेल्या सीमाला पाहून प्रवीण शेजारच्या छोटया आकांक्षाबरोबर बस स्टॉपकडे फिरायला गेला. तिला चॉकलेट घेण्याच्या बहाण्याने तो जवळच्या दुकानात थांबला. तेव्हा त्याच्या ऐकण्यात आल मी हर्षदाला तिचा नवरा त्रास देतो. घाई गडबडीत केलेल तिच लग्न फेल ठरल. तिने सीमाला मात्र कशाचीही घाई न करता graduation नंतरच लग्न करण्याचा सल्ला दिला.

बुधवारी दुपारी जेवण झाल्यानंतर प्रवीणने राजला फोन केला.

**राज** : अरे थंडी अशी बेकार पडते ना की, सकाळी जागच येत नाही लवकर.

**प्रवीण** : आणि मला स्वप्नातही सीमाच दिसते. तशी हर्षदापण तिच्या जोडीला. सुंदर आहे पण married

**राज** : 'पर स्त्री माते समान' नाही शिकवल काय रे तुला शाळेत ?

**प्रवीण** : नाही ' पर स्त्री मला ते सामान ?'

प्रवीणच्या या वाक्यावर त्याच्या ऑफीसचे मित्रही दिलखुलासपणे हसले. मात्र प्रविणच सीमा प्रकरण फक्त राज आणि सलीमलाच माहीती होत. होता होता जानेवारी उजाडला. नवे वर्ष, उत्साह, बोचरी थंडी याचीच चर्चा सोसायटीच्या



For more such ebooks visit www.esahity.com

प्रत्येक घरातुन चालु होती.

२१ जानेवारी ०५ शनिवारी प्रविण गच्चीवर असताना सीमा फोनवरुन वाढदिवसाच्या शुभेच्छा स्विकारत होती. अचानक जाग आल्यासारखा प्रवीणने सीमाला काहीतरी गिफ्ट देण्याचा विचार कला. रविवारी डेक्कन परिसरात फिरताना त्याने त्याचा मानस परममित्रांना सांगताच त्यांनी प्रविणला फैलावर घेतला.

**राज** : मला तर बाबा मुलींशी कस वागाव तेच कळत नाही. माझी ताई सोडली तर इतर कुठल्याही मुलींशी माझ बोलणही होत नाही.

**सलीम** : बरं त्यांना काय पाहीजे स्वत:लाच माहीती नसंत. एखादीकड बघितल तर म्हणते 'हा का एकटक माझ्याकडे बघतोय.' आणि नाही बघाव तर, ' माझ्याकडे पहात नाही ? हुँ'

**प्रवीण** : मी तुम्हाला फक्त गिफ्टच काय करू इतकच विचारलं. मुलीबद्दलचा तुमचा अनुभव नाही.

**सलीम** : I don't think youwill dare to do so.

**राज** : आणि तु काय म्हणून तिला gift देणार ? मित्र, शेजारी, का मी रोज तुला लपुन छपुन बघतो तु फार सुंदर आहेस, मला आवडतेस, हे घे. Be lated Happy Birthday.

**सलीम** : पण ती ते घेईलच कशावरून ? भावाला् नाहीतर Boy friend ला घेऊन येईन तुला मारायला.

**राज** : तु ते स्वप्न सोडून दे. तुझी तिची मैत्री होण कठीण आहे. वरुन तुला Girls fobia तु काय daring करणार नाही So stop thinking of that, प्रवीण come on yaar you have already discouraged me now I, my self think I am a gay ?

या एका इग्रंजी चित्रपटातल्या वाक्यावर तिघेही खळखळुन हसले.

मंगळवारी सकाळीच नवे कपडे घालुन हातात कॅरी बॅग घेतलेली सीमा दिसल्यावर प्रविण स्वत:शिच 'Good morning very very Good Morning' पुटपुटला. ती कुठेतरी रहायला चालल्याची कल्पना त्याला आली होती. म्हणजे दोन दिवस तरी आता गच्चीवर जाणे नाही.

शुक्रवारी संध्याकाळी प्रविणला सीमाचं दर्शन झाले. एरव्ही स्वयंपाकात गर्क राहणारी सीमा आज खूपच संथ, शांत, विचारमग्न, दिसत होती. स्वंयपाक ओट्यावर



For more such ebooks visit www.esahity.com

काही कागद ठेवले हाते. सीमाने मांडणीतुन तांदळाचा डबा काढला. काही तांदुळ कुकरच्या डब्यात घेतले. ओट्यावरचे कागद तांदळाच्या डब्यात खोल खोचून ठेवले. आणि डबा परत त्याच ठिकाणी ठेवू न दिला. आज तिच्या किचन मधला रेडीओ बंद होता. या सगळ्यांचाच आश्चर्य प्रविणला वाटत होते. अर्धा तास गेल्यानंतरही सीमा फारच गंभीर होती.

शनिवारी प्रविणला हाफ डे होता. ऑफिसनंतर फिरायला जाण्याच ठरवल असल्याने तो ऑफीसच्या मित्रांबरोबर कात्रजला गेला. संध्याकाळी सहा सातच्या दरम्यान घरी गेल्यावर प्रविणला एक धक्कादायक बातमी कळली. शेजारच्या बिल्डिंगमध्ये एका मुलीने आत्महत्त्या केली होती. तिला हॉस्पिटलमध्ये ठेवल होत. दिवाळीत रंग कामासाठी आणलेले शिल्लक 'स्पिरीट' तिन पिले होते.

जिवाला चूटपूट लावणाऱ्या या घटनेने सगळ्या सोसायटीमध्ये शोक पसरला होता. रविवारी दुपारी त्या मुलीची Dead body घेऊन Ambulance सोसायटीत शिरली तशी सीमाची आई रडत असल्याचे सर्वांना दिसले. तिला धिर देत सोसायटीतले लोक आणि सीमाचे नातेवाईक अंत्यविधिची तयारी करू लागले.

सीमाने आत्महत्त्या करण्याइतके काय झाले होते. याचाच विचार सर्वांना सतावत होत. हर्षदा माहेरी आली होती ती फक्त सीमाच्या अत्यंसस्कारासाठी पण तिने घरातली परिस्थिती पाहुन निदान महीनाभर तरी परत जाता येणार अशी शक्यता नवऱ्याला सांगितली तसा तो थोडा रागातच घरी निघुन गेला. इकडे प्रवीण - राज - सलीम यांच्या दृष्टीने या मागच्या कारणाचा शोध एकत्र बसून घेत होते.

**राज** : नाही यार, मुली ना by nature खूपच हळव्या असतात. छोट्या छोट्या गोष्टीसाठी रडण, रागावण त्यांना बर वाटत.

**प्रवीण** : अरे बाबा पण एखादी मुलगी Sucide करताना काहीतरी विचार करूनंच निर्णय घेत असेल ना ?

**राज** : Affair असेल नाहीतर One way love मुळे काहीतरी झालय इतक नक्की.

**प्रवीण** : Sucide करण्याइतकी Daring करण्यामागे कारणही तितकच काहीतरी ठोस Solid असणार.

**सलीम** : बरोबर, मला तर बाबा ब्लेडने दाढी करताना कापलं तरी टेन्शन येतंआणि स्पिरीट पिऊन हळूहळू येणारं मरण तर काय ......?



For more such ebooks visit www.esahity.com

प्रवीण : what ever, but she was a good airl. I did'nt see her out of her house when she was doing nothing

राज : आत्महत्त्या करणारे माझ्या मते हुकलेले असतात. यार इतक सुंदर मनुष्याचं जीवन इतक्या सहज सपवायचं म्हणजे, It is nonsense

सलीम : तस नाही तिला काहीतरी major problem असेल काही आजार तर.

प्रवीण : नाही रे, रोजच तर ती घरात काम करताना दिसायची स्वयंपाक, भांडी साफ - सफाई ती रेडिओ ऐकतच काम करायची नाचायची. ए मी काय म्हणतो, मी जर तिच्या बहीणीला त्या चिठ्ठीबद्दल सांगितल तर ?

राज : लटकतील, Police enquiry होते. sucide case ची

सलीम : आणि तुला काय माहीती की ती चिठ्ठी तिची Sucide note आहे.

प्रवीण : माझी Just एक शंका आहे.

सलीम : तु तिच्या बहीणीला कस सांगणार ? ती थोडीच तुला ओळखते ?

प्रवीण : नाही. ओळखत नाही पण तिनी मला बेरचदा पाहीलय सोसायटीत. चेहरा नवीन नाही तिला माझा.

राज : पण तुझा संबंधच काय ? का नको त्या फंदात पडतोस?

सलीम : तु म्हणतोस त्याप्रमाणे जर enquiry चालू असेल ना तर पोलिस तुला फुकटच गुंतवतील या प्रकरणात.

हे बघा तिच्या मरणाने सर्वांनाच Disturbe केलय निदान त्याच कारण कळाल तर काहीतरी Clear होईल.

प्रविणचा निर्णय पक्का होता. त्याचे मित्रांचा सल्ला न मानता हर्षदाची भेट घेतली. तेव्हा ती पार्कींगमध्ये उभी राहून कसला तरी विचार करत होती. प्रविण तिच्याकडे जात असताना ती जराशी गोंधळली.

हर्षदा : काय पाहीजे ?

प्रविण : मला बोलायचं जरा तुझ्याशी, सीमाविषयी....

हर्षदा : माझ्याकडे वेळ नाही, आई घरात एकटीच रडत असेल.



For more such ebooks visit www.esahity.com

प्रविण : मला तिच्या आत्महत्त्येच कारण समजलय.

हर्षदा : काय ? कस कळल तुला ? तिनी तर कुणालाच काहीही सांगितल नाही.

प्रविण : बरोबर आहे. मलापण तसं exact कारण नाही, माहीती पण मरणाआधी तिनी एक पत्र लिहून ठेवलय, मला ते कुठे आहे ते माहीती आहे.

हर्षदा : तुलाच कसं माहीती ? ती तुला ओळखत होती ?

प्रविण : नाही पण शुक्रवारी संध्याकाळी मी तिला एका डब्यात कागद ठेवताना पाहीलं होतं.

हर्षदा : कागद, पण कुठल्या डब्यात ?

प्रवीण : मी तुला सगळ खरंखरं सांगायला तयार आहे. पण तु फक्त ते पत्र घेऊन ये. तुच ते वाच नी मग मी पुढे काय ते तुला सांगतो.

हर्षदा : मी लगेच ते घेऊन येते.

प्रवीण : नाही लगेच नको. अशा वेळी जेव्हा घरात कुणाच्याही नकळत आणि ते मिळाल की तुमच्या शेजारच्या योगेशकडे मला निरोप दे. मी तुला गच्चीवर भेटतो.

हर्षदा : ठिक आहे मी तुला कळवते तसं

संध्याकाळी प्रविण हर्षदाला चिठ्ठी मिळते की नाही ते पहायला म्हणून गच्चीवर गेला. त्यावेळी सिमाच्या घरात एक बाई स्वंयपाक करत होती. तर हर्षदा दुपारी धुऊन वाळत घातलले छोटे कपडे खिडकीतुन काढुन घड्या करताना त्याला दिसली. हर्षदाने त्या बाईला बाहेर आईजवळ बसायला सांगितले आणि ते कपडे तिला दिले. तशी ती बाई मायेन हर्षदाच्या डोक्यावर हात फिरवुन गेली. कुकर शिजेपर्यंत वेळ आहे हे लक्षात येताच, हर्षदाने मांडणीतले दोन मोठे डबे एकापाठोपाठ एक तपासले मग मसाल्यांचा, डाळीचा, साखरेचा आणि तांदळाचा डबा तिने पाहीला. त्या डब्याच्या तळाशी तिला सिमाच्या hand writing मधली ती चिठ्ठी सापडली. तसा प्रविणही खुष झाला.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी गाडी पार्क करताना प्रविणला नऊ वर्षांच्या योगेशने हर्षदाचा निरोप दिला आणि तो परत खेळात रमला. प्रविणही घरात डबा ठेवुन बुट काढून गच्चीवर गेला तेव्हा हर्षदा एका लहान मुलीबरोबर बसली होती.



For more such ebooks visit www.esahity.com

**हर्षदा** : ये मी मुदद्दाम योगेशला सांगितले होत की तु कामावरून येताना दिसल्यावर निरोप दे नाहीतर त्यानी घरी निरोप ठेवला असता तर गडबड झाली असती.

**प्रवीण** : तुला ते पत्र मिळाल ना ?

**हर्षदा** : घे आणि मी ते वाचल. तिने आत्महत्या करण्याला तिच्या संबंधातले सगळे पुरुष जबाबदार आहेत.

**प्रवीण** : सॉरी, पण मला नक्की काय झाल ते जाणुन घ्यायचं, बघू दे पत्र.

हर्षदाने ते पत्र प्रविणला दिल आणि रडतच ती घरी निघुन गेली. प्रविण अधिरपणे ते पत्र वाचायला सुरुवात केली.

आई मी असं का करतीये याचं उत्तर कदाचित मला नीटपणे देता येणार नाही. पण कदाचित हाच एक मार्ग आता माझ्यापुढे शिल्लक आहे. मी सुंदर आहे. यात दोष कुणाचा मला माहीती नाही. पण माझ्या सुंदर असण्याचे फार विचित्र परिणाम मला भोगायला लागलेले. आपलं आधीच घर चांगल्या ठिकाणी नसताना आपण तिथे १५-१६ वर्षे काढली. ताईच बारावीपर्यंत शिक्षण छान झालं. पण तिच्यावरही तिथल्या लोकांची वाईट नजर होती. म्हणून इच्छा असतानाही तिला पुढे कॉलेजला नाही जाऊ दिलंत, तुम्ही. नंतर फक्त अडीच वर्षात बाबांच्या रिटायरमेंटचे पैसे आल्यावर तिचं लग्न करून दिलंत. तोपर्यंत माझी कॉलेजची वेळ आली. मी हुशार होते म्हणून तुम्ही मला कॉलेज पूर्ण करायची परवानगी दिलीत. सायन्स ऐवजी कॉमर्सनी मी बारावी पास झाले. अगदी त्याच वर्षी बाबांनी नव्या फ्लॅटसाठी पैसे जमा करून आपण नवीन घरात शिफ्ट होणार असल्याचं सांगितलं. तिकडच्या शंकर, गणेश, संतोष, राजु यासारख्या मुलांपासून मला पुढे काही त्रास होऊ नये म्हणून बाबांनी ही सगळी व्यवस्था केली. पण सुंदर आणि जवान मुली घरात बसल्यातरी सुरक्षित नसतात. याची त्यांना कल्पना नसावी. माझं कॉलेज जरी पुण्यातल्या नावाजलेल्या कॉलेजपैकी एक असलं तरी मुलांची मुलींबद्दलची मतं बदलण त्यांनाही शक्य नसतं. आमच्या ग्रुपमधले किंवा ग्रुपबाहेरचे अशा किती तरी मुलांची इच्छा होती की एकदा तरी .... सगळेच आपली इच्छा बोलून दाखवित नाहीत. पण त्यांची बोचरी, हपापलेली नजर सगळं सांगून जाते. माझ्या मैत्रिणींनी याच एका कारणासाठी ग्रुप सोडून दिला. आम्हाला पाहणारा प्रत्येक जण वळून वळून पहायचा. एकदा का होईना बोलायची, मैत्रीची संधी शोधायचा त्यांना तरी किती दिवस टाळणार? एक


For more such ebooks visit www.esahity.com

वेळ बघणाऱ्याची नजर चुकवता येते. पण जो तुमच्याबद्दल चार - चौघात टाँट मारतो. त्याच काय ? मी कॉलेजातुन लवकर घरी येण्यामागे आणि घरा व्यतिरिक्त कुठही न जाण्याच हेच कारण आहे.

घरात असलं तरी कुणीतरी कुठूनतरी आपल्याला बघत तर नाही ना ही भिती.

वाढदिवसानंतर मी ताईकडे रहायला गेले. तर मुला मी किती असुरक्षित आहे, याची जाणिव मला झाली. आंघोळीनंतर बाथरूममध्ये वाळत घातलेले माझे आतले कपडे भाऊजी न्याहाळत बसायचे. एकदा तर म्हणाले 'पुरुषाला कसली आलीय फॅशन ? पोरींच्या बघा अंडरवेअर्स पण रंगीबेरंगी, फुलांच्या, नक्षीकाम केलेल्या असतात.' तेव्हा ताईने वेळ मारून नेली. तरीही भाऊजीची वाईट नजर माझं कुठं काही दिसतंय का ते शोधायची. परवा दुपारी ताई दुकानात गेली होती. भाऊजींनी ड्युटीवरून घरी जेवायला आले मी त्यांना जेवायला वाढताना त्यांनी मागुन येऊन माझ्या पाठीवरून हात फिरवला. तो घाणेरडा प्रकार मला मुळीच नाही आवडला. बर ताईला हे सांगण म्हणजे शेवटी माझ्याच अब्रुचे धिंडवडे निघणार हे माझ्या चांगल्या लक्षात होते. मी भाऊजींकडे रागावुन पाहीलं तर मला म्हणाले. 'अगं आपल नातंच तसं आहे. तु फक्त एकदाच मला खुष कर मी परत तुला कधीच काहीच मागणार नाही.' याला मी काय उत्तर दयायचं ?

दुसऱ्याच दिवशी मी घरी परत आले. मनावर दगड ठेवुन ठरवलं 'असलं लाजिरवाण जगण नको. त्यापेक्षा मेलेलं बरं.'

मी कदाचित चुकीचा निर्णय घेतलाय पण या जिवंतपणीच्या छळापेक्षा एका झटक्यात आलेला मुत्यू कधीही चांगला.

माझ्याबरोबर जे घडलं ते कितीतरी इतर मुलींबरोबर घडत असेल. त्यांना ते मुकाट्यानं सोसायची सवय पडली असेल. मी तसं नाही करू शकत आणि मी माझ्या मरणासाठी कुणालाही दोषही देत नाही. तुला काहीही न बोलता मी निघून जातेय. मला माफ कर.

तुझी सीम्मू

शनिवारी घरी आलेल्या प्रविणला हर्षदाचा निरोप मिळाला की, तिने त्याला घरी बोलावलयं. सीमाचा दहावा होऊन गेल्याने सगळे पाहुणे परत गेलेले होते. प्रविण हर्षदाच्या घरी गेला. तेव्हा तिच्या मावशीने दार उघडलं. घरात हर्षदा, तिचे आई



For more such ebooks visit www.esahity.com

वडील, मावशी व चुलतभाऊ होते. थोडा वेळ निरव शांतता होती. नंतर मावशीने प्रविणला चहा आणून दिल्यावर हर्षदाने ते पत्र प्रविणला परत मागितलं ते प्रविणच्या पाकीटात होतं. घरी कुणी त्याचा गैर अर्थ काढू नये म्हणून त्याने ते पाकीटात ठेवलं होतं. बहुतेक त्या पत्राची सर्व हकीकत हर्षदाने घरात सांगितली होती.

हर्षदा : Thank you प्रवीण तु नसतास तर आम्हाला इतकी मोठी गोष्ट फारच उशिरा समजली असती.

विशाल : (चुलत भाऊ) तु या सगळ्यात आम्हाला मदत केलीस पण आम्ही तुझं नाव कुठेही मध्ये आणणार नाही...

प्रवीण : म्हणजे मला काही समजलं नाही.

वडील : सीमाच्या आत्महत्येची रिपोर्ट पोलिसाना दिल्यानंतर त्यांनी तपास सुरु केला. तिच्या जवळच्या मित्र - मैत्रिणीकडे विचारपूस झाली. पण त्यांना कसलाही धागादोरा न सापडल्याने तपास थंड पडला आणि आम्ही आमच्या जावयावर केस टाकणार आहोत.

प्रवीण : तुमचं म्हणणं बरोबर आहे. काका पण मला वाटत त्याने काही होणार नाही. कारण त्या पत्रातही सिमाने कुणालाही दोष देत नसल्याचं मान्य केलंय.

हर्षदा : म्हणून काय त्याला मोकळा सोडायचा ? पोलिस पण किती वाईट वागतात ते कळू देत सगळ्यांना.

विशाल : अरे दिड वर्षे झाली. तिच्या लग्नाला पण त्याच्याबद्दल चांगलं बोलणारा कुणीच नाही भेटला मला. मी तर त्याच्याशी बोलतच नाही. आता तर तो डोक्यातच बसलाय. अरे दुसऱ्याच्या मुली काय रस्त्यावर नाही पडलेल्या, तुला खुष करायला.

हर्षदा : मी अगदी घटस्फोटाचीपण तयारी केलीये. दिडवर्षांत मलापण काही कमी त्रास नाही दिला त्यानं लग्नापूर्वी सगळं गाव आणि लग्नानंतर नवरा, सगळे पुरुष सारखेच. सीमाशी लग्न लावुन द्या, म्हणून आमच्या आत्याचा मुलगा किती मागं लागला होता. दहावी नापास, रिक्षा चालवणारा, मवाली तो. तो पण याच्यासारखाच .....

वडील : हर्षू तो विषय वेगळा, आपण ते नंतर बोलू.

प्रवणी : बरं काका मी येतो. काही गरज लागली तर बोलवा मी नक्की येईन.



For more such ebooks visit www.esahity.com

प्रविण घरातून बाहेर पडला पण त्याच मन खूप आस्थिर झालं होत. विशालचा चिडलेला चेहरा, हर्षदाचा राग वडीलांची हतबलता आणि आईची शुन्यता लागलेली नजर त्याच्या पुढून हलत नव्हती. 'खरंच मुलींचा जन्म इतका वाईट असतो?' असा विचार त्याला सतावत होता.

आज त्या घटनेला दोन - अडीच वर्षे होऊन गेली. हर्षदाच्या नवऱ्यावर केलेली केस फिकी पडत जाऊन निकाल त्याच्याच बाजुने लागला. हर्षदाने मात्र जिद्दीने जोर लावुन धरला म्हणून तिला Divorce मिळाला. तिच्या आईची अवस्था फारच दयनीय आहे. वडील मरण येत नाही म्हणून जगताहेत. तर हर्षदा एका ठिकाणी कामाला लागुन पर्मनंट झालीये.

या सगळ्या प्रकरणात अप्रत्यक्षरित्या सामील असलेला प्रविण कधीतरी गच्चीवर बसुन सीमाचा विचार करत असतो. सोसायटीत कुणालाच काहीही माहीत नाही. तरी मागच्या sunday ला प्रविणने राज. सलिमकडे एक विचार मांडला आणि त्याबाबत त्याचा निर्णय पक्का असल्याच सांगितले.

प्रविण : Hey boys what if I marry with divorcee lady ?

राज : No man why do you allways have something like this ?

प्रविण : means what ? तु त्या सीमा प्रकरणातून तिच्या घरच्यांच्या उपकारांमुळे Last time बचावलास नाहीतर इतरांच्या घरात डोकावणाऱ्या गुन्ह्यात तू खडी फोडत असला असतास. काय पण बोलतो....

राज : ए सल्लु, तु बोल यार You know how I am serious about everything.

सलिम : If you are thinking of Harshada then I don't think It is possible.

प्रविण : See this time again you are discouraging me.

राज : You silly chap. why do you want to marry her If it



For more such ebooks visit www.esahity.com

is becuuse of mere sympathy about her then she also won't like that.

प्रविण : No man, I really like her, she is brave.

सलीम : सोच ले मामु, उसको बुरा लग गया तो तुम लोंगो की बची - कुची दोस्ती है ना वो भी खल्लास

राज : चल छोड ये तेरी Personal life है, वैसे भी तु हमारी सुनता कहा हैं?

सलीम : हां, अगर you are confident about her and ready to face your family, then go ahead.

खरंच कुणी सुंदर असणं गुन्हा आहे का ?





For more such ebooks visit www.esahity.com